मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, अमरावती या कार्यालयातील नियत अस्थायी आस्थापनेवरील पदांना दि. ०१/०३/२०१९ ते दि. ३०/०९/२०१९ पर्यंत मुदतवाढ देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन निर्णय क्रमांक- मुदतवाढ -२०१९/७१०/प्र.क्र.१५५/ मोप्र-(२)
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक :- १०/०४/२०१९

<u>वाचा-</u> १) शासन निर्णय, जलसंपदा विभाग क्रमांक- मुदतवाढ -२०१८/१९५६/प्र.क्र.५३४/मोप्र-(२) , दि. २९/१०/२०१८

२) मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, अमरावती यांचे पत्र.क्र. ए-१/प्राका/मुप्र-२/बृधाक्र.१५३९/१४९९/२०१९, दिनांक २० /०३/२०१९

३) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक पदनि २०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क, दिनांक २१/०२/२०१९

४) शासन निर्णय, पाटबंधारे विभाग क्रमांक आढावा २००२(३३५/२००२)/आ (प्रशि), दि.०६/०२/२००३

<u>प्रस्तावना :-</u>

मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, अमरावती या कार्यालयातील नियत अस्थायी आस्थापनेवरील ३० पदांची निर्मिती संदर्भाधिन क्रमांक ४ येथील शासन निर्णयान्वये करण्यात आली आहे. संदर्भीय क्र.१ च्या शासन निर्णयान्वये नियत अस्थायी आस्थापनेवरील ३० पदांना दिनांक ३०/०९/२०१८ ते दिनांक २८/०२/२०१९ पर्यत चालू ठेवण्यास मंजूरी देण्यात आली होती. संदर्भ क्रमांक ३ च्या वित्त विभागाच्या शासन निर्णयान्वये सर्व प्रशासकीय विभागांना त्यांच्या आकृतिबंधात समाविष्ट असलेल्या अस्थायी पदांना तसेच यापूर्वी आढावा मंजूर केल्यावर निर्माण करण्यात आलेल्या परंतु ज्यांचा समावेश आकृतिबंधात करण्यात आलेला नाही अशा अस्तित्वात असलेल्या सर्व अस्थायी पदांना दिनांक ०१/०३/२०१९ ते दिनांक ३०/०९/२०१९ पर्यंत मुदतवाढ देण्याचे अधिकार देण्यात आले आहेत.

<u>शासन निर्णय :-</u>

मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, अमरावती यांचे संदर्भ क्र. २ अन्वये प्रस्तावित केल्यानुसार आता मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, अमरावती या कार्यालयातील नियत अस्थायी आस्थापनेवरील ३० पदांपैकी उपलब्ध करुन दिलेल्या ३० पदांना सोबतच्या परिशिष्ट - अ मध्ये दर्शविल्याप्रमाणे दिनांक ०१/०३/२०१९ ते ३०/०९/२०१९ पर्यंत खालील अटींचे अधिन राहून मुदतवाढ देण्यात येत आहे.

१. उपरोक्त सर्व पदे विभागाने प्रस्तावित केलेल्या कालावधीत कार्यरत असतील.
२. ही पदे आकृतीबंधानुसार मंजूर असतील व सहा महिन्याहून अधिक कालावधीसाठी रिक्त नसतील.

उपरोक्त कार्यालयातील खर्च, मागणी क्रमांक आय-५ (नियत अस्थाई आस्थापना), मुख्य लेखाशीर्ष- ४७०१ मोठे व मध्यम पाटबंधाऱ्यावरील भांडवली खर्च,८० सर्वसाधारण, (१९०) सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमांतील गुंतवणूका, (०४) विविध पाटबंधारे विकास महामंडळांना भाग भांडवली अंशदान, (वेतन) (०४)(०२) विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळास भाग भांडवली अंशदान (४७०१ आय १७-१) या लेखाशीर्षाखाली महामंडळास मंजूर असलेल्या नियत अस्थाई आस्थापनेच्या वेतनाखाली मंजूर असलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

हे आदेश वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक पदनि २०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क, दिनांक २१/०२/२०१९ अन्वये प्रशासकीय विभागास दिलेल्या प्राधिकारानुसार तसेच आंतरवित्त सल्लागार व उप सचिव यांचे सहमतीने निर्गमित करण्यांत येत आहे.

सदर शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१९०४१०१५१२२१४२२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Pandurang Tulshiram Kedare

Digitally signed by Pandurang Tulshiram Kedare
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e594e26c6ca4bffd8b1d4e20a155e473c21b0dd40f25c25bd478079005896501, cn=Pandurang Tulshiram Kedare
Date: 2019.04.10 15:15:05 +05'30'

सहपत्र- परिशिष्ट 'अ'

(पांडुरंग केदारे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत- सहपत्रासह-

१) महालेखापाल २, महाराष्ट्र राज्य, (लेखा व अनुज्ञेयता) नागपूर,
२) महालेखापाल २, महाराष्ट्र राज्य, (लेखापरीक्षा) नागपूर,
३) जिल्हा कोषागार अधिकारी, अमरावती
४) वित्त विभाग, व्यय-१२, मंत्रालय, मुंबई,
५) कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ,नागपूर
६) मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, अमरावती यांना कळविण्यात येते की, प्रस्तुत शासन निर्णयान्वये मंजूरी दिलेल्या अधिकारी /कर्मचारी यांच्या व्यतिरिक्त इतर अधिकारी / कर्मचा-यांची वेतन व देयके अदा केल्यास तसेच या निर्णयान्वये दिलेल्या मंजूरीच्या प्रत्यक्ष/अप्रत्यक्षरित्या चुकीचा अर्थ लावून अन्य अधिकारी/कर्मचारी यांची वेतन देयके अदा केल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्यांवर राहील, याची कृपया नोंद घ्यावी.
७) मोप्र-(२) कार्यासन, संग्रहार्थ.

परिशिष्ट अ

शासन निर्णय क्र. मुदतवाढ -२०१९/७१०/प्र.क्र.१५५/मोप्र-(२), दिनाक १०/०४/२०१९ चे सहपत्र
नियत अस्थायी आस्थापनेवरील खालील नमूद ३० पदांना दि. १/०३/२०१९ ते दि. ३०/०९/२०१९ पर्यंत मुदतवाढ

अ.क्र.	पदनाम	आकृतिबंधानुसार मंजूर पदे	मुदतवाढ द्यावयाची पदे
	तांत्रिक पदे		.
१	मुख्य अभियंता	१	१
२	सहायक मुख्य अभियंता (कार्यकारी अभियंता)	२	२
३	उप अभियंता	३	३
४	कनिष्ठ अभियंता	३	३
५	मुख्य आरेखक	१	१
६	विशेष अधीक्षक	१	१
७	अधीक्षक	१	१
८	मुख्य दप्तर कारकून	१	१
९	प्रथम लिपिक	१	१
१०	वरिष्ठ लिपिक	२	२
११	कनिष्ठ लिपिक	२	२
१२	लघुलेखक उच्चश्रेणी/निम्नश्रेणी	१	१
१३	टंकलेखक	३	३
१४	दूरध्वनीचालक	१	१
१५	वाहनचालक	१	१
१६	दप्तरी	१	१
१७	नाईक	१	१
१८	शिपाई	३	३
१९	चौकीदार	१	१
	एकूण	**३०**	**३०**
	एकूण मुदतवाढीची पदे -३०		